# मुंबई विद्यापीठ

कुलसचिव यांचे
कार्यालय
फोर्ट परिसर,
मुंबई विद्यापीठ,
मुंबई ४०० ०३२

---

# परिपत्रक

## (अत्यंत महत्वाचे)

No. REG/ICC/2020-21-09

**विषय** : महाराष्ट्र राज्यात Mission Begin Again या अंतर्गत मर्यादीत उपस्थितच्या काळात महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत

**संदर्भ** : १. शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्र. डीएमयु—२०२०/सीआर—९२/डीआयएसएम—१, दिनांक ३१ मे, २०२०
२. शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन,क्र. डीएमयु—२०२०/सीआर—९२/डीआयएसएम—१, दिनांक ४ जून, २०२०
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:समय—२०२०/प्र.क्र.३५/१८ (र.वका) दि. ४ मे, २०२०
४. महाराष्ट शासन वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण १०२०२०/प्र.क्र.०१/सचिव (व्यय), दि. ५ जुन, २०२०
५. महाराष्ट शासन प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय क्र. समय २०२०/प्र.क्र.३५/१८ (र.वका), दि. ५ जुन, २०२०
६. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कोकण विभाग, पनवेल, यांचे पत्र क्र. विससं/उशि/काविप/मशि—१/२०२०/६४५, दि. ६ जुन, २०२०
७. शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्र. डीएमयु—२०२०/सीआर—९२/डीआयएसएम—१, दिनांक २९ जून, २०२०
८. शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्र. डीएमयु—२०२० /सीआर—९२/डीआयएसएम—१, दिनांक २९ जुलै, २०२०.
९. उशिसं/२०२०/कोरोना/मवि-१/४९५५, दिनांक ३० जुलै, २०२०
१०. विद्यापीठाचे परिपत्रक क्र REG/ICC/2020-21-28 दिनांक ३ ऑगस्ट, २०२०
११ .Ministry of Home Affairs (MHA) Order dated No.40-3/2020-DM-I(A) dated 29th August, 2020
१२.शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्र. डीएमयु—२०२०/सीआर.९२/डीआयएसएम—१, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२०.

कोव्हिड—१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जारी केलेल्या लॉकडाऊन काळात महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी/ कर्मचारी यांच्या महाविद्यालयातील व कार्यालयातील मर्यादीत उपस्थिती व शैक्षणिक व कार्यालयीन कामकाजाबाबत विद्यापीठाने वेळोवेळी शासनाकडून प्राप्त सुचनांनुसार परीपत्रके / आदेश निर्गमित केलेले आहेत.

उपरोक्त संदर्भाधीन शासन आदेश क्र. १२ नुसार Mission Begin Again अंतर्गत कोव्हिड–१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जारी केलेल्या टाळेबंदी (लॉकडाऊन) काळात महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी/ कर्मचारी यांची महाविद्यालयातील/कार्यालयीन उपस्थिती मर्यादीत ठेवण्याबाबत शासनाकडून सूचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत तसेच दिनांक ३० सप्टेंबर, २०२० पर्यंत टाळेबंदी जाहिर करण्यात आली आहे.

वरील संदर्भीय शासन आदेश क्र १३ मधील ४ (iii) (a) नुसार महाविद्यालयांतील वर्ग १ व वर्ग २ संवर्गातील अधिकारी यांची १००% उपस्थीती अनिवार्य आहे तसेच ४ (iii) (b) a. नुसार वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील कर्मचा–यांची ३०% किंवा किमान ३० कर्मचारी यापैकी जे जास्त असेल त्या प्रमाणे आळीपाळीने कार्यालयीन उपस्थिती अनिवार्य आहे. तसेच ज्या कर्मचा–यांना कार्यालयात उपस्थितीत राहण्यापासून सुट मिळेल त्यांनी घरी राहून (Work From Home) या संकल्पनेद्वारे कार्यालयीन कामकाज करावे व जे कर्मचारी रजेवर आहे त्यांचा यात समावेश करु नये.

संदर्भ क्र ४ व ६ नुसार मर्यादीत उपस्थितीच्या काळात कार्यालयातील कर्मचा–यांच्या उपस्थिती सुनिश्चित करणे व वेतन आहरित करण्याबाबत शासनाकडून सुचना करण्यात आल्या आहेत त्यानुसार संलग्नित महाविद्यालयांच्या प्रचार्यांनी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांच्या उपस्थितीतबाबत आवश्यक त्या उपायायोजना कराव्यात.

प्रतिबंधित क्षेत्रात (Containment zone) रहिवास असणा–या शिक्षक/अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयात कामकाजाकरीता बोलवू नये तसेच त्यांना घरी राहून (Work from Home) काम करण्याबाबत सुचना दयाव्यात.

वरील संदर्भीय शासन निर्णय / परिपत्रक नुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/ मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक यांनी आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

तरी, सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक यांनी उपरोक्त बाबी आपल्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून दयाव्यात.

**ठिकाण : मुंबई -४०००३२** **(डॉ. विनोद पाटील)**
**दिनांक : ०२ सप्टेंबर, २०२०** **प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी –**

१ मुंबई विद्यापीठाशी संलग्नित / संचलित विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व संचालक.

२ स्वीय सहाय्यक : १) कुलगुरु २) प्र–कुलगुरु ३) कुलसचिव ४) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ ५) वित्त व लेखा अधिकारी